**नि.क्र. २७ खालील आदेश**

प्रस्तूतचा अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. सामनेवाले यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराचे वकील गैरहजर. अभिलेखाची पडताळणी केली असता, नि. क्र. ११ वरील दि. १५.१०.२०१५ च्या आदेशान्वये प्रत्येकी दरमहा रु. १०,०००/- पोटगीचे आदेश झाल्याचे दिसून येते. परंतू सदरच्या आदेशाची अर्जदाराने पूर्तता केल्याचे दिसून येत नाही. अर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल केलेले रिट पिटीशन क्र. ७८३२/२०१६ प्रलंबित असल्याचे नमुद केले असले तरी त्याबाबतचे दस्त अभिलेखावर आलेले नाहीत. तसेच प्रस्तूतच्या प्रकरणात मुद्दे प्रस्थापित केल्यानंतर अर्जदारातर्फे याचिकेत कोणीही हजरही राहत नसल्याचे दिसून येते. सदरहू अर्ज २ वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित असतानाही अर्जदारातर्फे सदर अर्ज चालविण्यासाठी कोणीही हजर राहीले नाही. त्यामुळे अर्जदार हा नि. क्र. ११ वरील आदेशाची पूर्तता करण्याचे टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येते. सबब, प्रकरणाची एकंदरीत परिस्थिती पाहता प्रस्तूतचा अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजूर होणे पात्र आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश करण्यांत येत आहे :

**आदेश**

१. अर्जदाराने दाखल केलेली याचिका खारीज करण्यांत येत आहे.

२. सामनेवाली हिने दाखल केलेला प्रतिदावा पुढे चालविण्यात यावा.

दिनांक : २८/०३/२०१९

(श्रीमती एम.एस. कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, कल्याण.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHTH070012232014/truecopy/order-2.pdf

www.ecourtsindia.com

**M.P. 686/2014**

**Order below Exh. 1**

In view of order passed below Exh. 22, the main petition filed by petitioner stands dismissed. Proceeding in counter claim filed by the respondent be contined.

Kalyan.
Date: 28.3.2019

(Smt. M.S.Kulkarni)
Jt. Civil Judge, S.D., Kalyan.

www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHTH070012232014/truecopy/order-2.pdf